परभणी जिल्हयातील ग्रामीण व शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड करिता पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाच्या पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

● संशोधक ●

रामेश्वर दगडोबा वाघ

एम.ए., एम.एड, सेट, नेट (शिक्षणशास्त्र)

● मार्गदर्शक ●

डॉ. श्री. एस.एस. टेकाळे

एम.ए.,एम.एड, एम.फिल (मराठी) पीएच. डी. (शिक्षणशास्त्र)

प्राचार्य,

श्रीमती इंदिरा गांधी आध्यापक महाविद्यालय, नांदेड (महाराष्ट्र)

अभ्यास केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वर्ष-2016

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सन 2016

पीएच.डी. साठी संशोधन आराखडा

संशोधकाचे नाव :- वाघ रामेश्वर दगडोबा

मोबाईल नंबर :- 9049514975

ई-मेल :- rameshwarwagh2010@gmail.com

वर्गवारी :- अराखीव

फिजिकल हॅन्डीकॅप्ड :- होय (अस्थीव्यंग)

मार्गदर्शकाचे नाव :- श्री. टेकाळे एस.एस.

प्राचार्य, श्रीमती इंदिरा गांधी आध्यापक महाविद्यालय, नांदेड

मोबाईल नंबर :- 9423342986

ई-मेल :- shivajitekale7@gmail.com

विषयाचे नाव :- शिक्षणशास्त्र

संशोधन विषयाचे शिर्षक :- परभणी जिल्हयातील ग्रामीण व शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.

अनुक्रमणिका (Index)

अ.क्र.	घटक	पान क्रं.
1.	प्रस्तावना	
2.	संशोधनाची गरज	
3.	संशोधनाचे महत्व	
4.	संशोधनाचे शीर्षक	
5.	समस्या विधान	
6.	परिकल्पना	
7.	कार्यातमक व्याख्या	
8.	संशोधनाची उद्दिष्टये	
9.	चले	
10.	संशोधनाची गृहितके	
11.	व्याप्ती	
12.	मर्यादा	
13.	संशोधन पध्दती	
14.	जनसंख्या निवड	
15.	न्यादर्श निवड	
16.	संशोधनाची साधने	
17.	सामग्री विशलेषण पध्दती	
18.	आधार सामुग्रीचे प्रकार	
19.	माहिती विश्लेषणाची पध्दती	
20.	सारांश, निष्कर्ष, शिफारशी	
21.	प्रकरण योजना	
22.	वेळापत्रक	
23.	अंदाज पत्रक	

प्रस्तावना :-

शिक्षण क्षेत्राच्याबाबतीत महाराष्ट्र राज्याचा समावेश देशातील प्रथम तीन राज्यामध्ये करण्याचे उद्दिष्ट मा. मुख्यमंत्री महोदयांनी सन 2015 मध्ये शालोय शिक्षण विभागास दिले होते. त्यावेळी राज्यांच्या क्रमांकाचे विश्लेषण केले असता असे दिसले की, भाषा, विषयांमध्ये राज्य देशामध्ये दहाव्या क्रमांकावर तर गणित विषयामध्ये शेवटून पाचव्या, क्रमांकावर होते.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी सन 2014-15 . मध्ये इयत्ता पाचवी वर्गाच्या केलेल्या मूल्यमपानामध्ये भाषा विषयांची सरासरी 53 टक्के वरून 56 टक्के वर गेली तर गणित विषयाची सरासरी 50 टक्के वरून 44.7 टक्के इतकी खाली आली. येथे सुध्दा गणित विषय चिंतेची बाब आहे. आपण मेहनत करूनसुध्दा परिणाम मिळत नाही. विशेष करून गणित इतर सर्व विषयामध्ये मग काय करावे?

एका संशोधनातुन असे दिसून आले आहे की, पहिलीच्या वर्गातील मुलांना गणित विषयाची भीती वाटत नाही. परंतु हिच मुले पाचवीला पोहचतात तेव्हा साधारण 50 टक्के मुले गणित विषयाला घाबरायला लागतात आणि दहावीला पोहोचता-पोहचता साधारणतः 80 टक्के मुलांना वाटायला लागते की, गणितापासून केव्हा सुटका होतीय? याचा अर्थ असा की शाळेच्या गणित शिकवण्याच्या पध्दतीत काहीतरी अडचण आहे. ती अडचण नेमकी कोणती? हे शोधण्यासाठी प्रौढांना विचारण्याची आवश्यकता आहे. प्रौढांना एखाद्या समारंभामध्ये विचारल्यास किती लोकांना गणिताची भीती वाटते तर साधारणतः निम्मे लोक हात वर करतात. परंतु मातृभाषेची किती लोकांना भीती वाटते असे विचारल्यास निम्मे काय एक सुध्दा हात वर येत नाही. मग हे लोक ज्या पध्दतीने भाषा शिकले व ज्या पध्दतीने गणित व इतर विषय शिकले या दोन्ही पध्दतीमध्ये काहीतरी फरक असला पाहिजे. भाषेचे बरेच शिक्षण विशेष करून ऐकणे व बोलणे शाळेत येण्यापूर्वीच झालेले असते. याबद्दल मुले बरेच काही शिकून आलेले असतात. त्यांच्याकडे मोठी शब्दसंपत्ती सुध्दा असते. भाषेमध्ये शाळेत त्यांना मुख्यत्वेः वाचन आणि लेखन शिकावयाचे असते.

गणितामध्येसुध्दा मुलांना शाळेत येण्यापूर्वी काही श्रवणाची आणि बोलण्याची माहिती असते. थोडे शिकलेल्या पालकांची सहा वर्षे वयांच्या मुलांना तीन बोटं दाखवा म्हटल्यांवर ते दाखवू शकतात. ही मुले पूर्व प्राथमिक शिक्षणात किंवा अंगणवाडीत गेल्यास हळू-हळू गणिताचे संबोध स्पष्ट व्हायला सुरूवात होते. परंतु त्याचा लाभ मिळाला नसल्यास किंवा तेथे योग्य पध्दतीने शिकवले गेले नसल्यास त्याच मुलाला टोपलीतून तीन लिंबे काढून द्या म्हटल्यावर बहुतेक दाखवू शकणार नाही. ह्याला कारण काय तर त्या मुलांना तीन बोटे ही भाषा माहीत आहे. परंतु तीन लिंबे ही भाषा माहीत नाही. अर्थात त्यांना घरात जेवढे वापरले गेले तेवढी भाषा माहित आहे.

घरात गणितीय संकल्पनेबरोबर इतर विषयाच्या संकल्पनाशी संबंधित संबोध स्पष्ट करण्याच्या दृष्टीने भाषा वापरली जात नाही. ते हेतुपूर्वक करण्याची बाब आहे. त्यामुळे मुलांना घरात भाषा विषय शिकायला मिळते. परंतु गणित व इतर विषय शिकायला मिळत नाहीत. त्या मुलाला तीन बोटं हा शब्द समुह महित आहे. परंतू त्यातले तीन यास संख्यात्मक संकल्पना आहे हे माहित नाही. म्हणून तीन सोबत बोटं ऐवजी लिंबे आले की, त्या मुलाला तीन लिंबे हे शब्दसमूह समजणार नाही. मुलांना गणित शिकवताना तीन ची संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. मुलांना अशा मूलभूत गणितीय संकल्पना स्पष्ट न झाल्याने गणिताची भीती निर्माण होते ही भीती आयुष्यभर टिकून राहते. लहानपणी गणिताची भीती निर्माण झाली आणि मोठे झाल्यावर शिक्षक व्हावे लागते अशी स्थिती असू शकते. म्हणून रारज्यातील प्रत्येक शिक्षकाने मुलभूत गणितीय संकल्पना शिकण्याची शास्त्रशुध्द पध्दती शिकुन घेण्याची आवश्यकता आहे असे स्पष्ट होते.

मेहनत करून सुध्दा गणित, भाषा व इतर विषयामध्येसुध्दा परिणाम मिळत नाही. तेंव्हा मेहनतीची दिशा बदलण्याची आवश्यकता आहे त्यासाठी शिक्षण प्रशिक्षणात विद्यार्थ्याच्या अध्ययनाशी संबंधीत बाल मानसशास्त्रीय बाबी, विषयज्ञान, विद्यार्थ्याच्या अध्ययनावर परिणाम करणारे घटक या बार्बीचा समावेश असणे गरजेचे आहे.

1. ज्या मुलांना शिकण्यात अडथळे निर्माण झाले आहेत ते दूर करणे.
2. जी मुले शिकत आहेत त्यांच्या शिकण्याच्या गतीत वाढ करणे.

आवश्यक ठरते.

महाराष्ट्राप्रमाणेच परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळेत सर्व विषयात अध्ययन करणारे विद्यार्थी हे अप्रगत, साधारण व प्रगत अशा विविध गटात मोडतात. त्यांच्याकडे शिक्षकांना वैयक्तीक लक्ष पुरविणे शक्य होत नाही. प्रत्येक मुल स्वतःच्या गतीने शिकते त्याच्या अध्ययनावर त्याची स्वतःची बुध्दिमता, मानसिक व शारीरिक कुवत, त्याची स्मृति व अवधान कक्षा, त्याचा कल, आवड-निवड त्याला मिळणारी प्रेरणा व त्याचे प्राविण्य इत्यादी घटक परिणाम करतात. तर त्याच्या कुटुंबाचा आर्थिक सामाजिक दर्जा, त्याच्या सभोवतालचे वातावरण, शाळेतील वातावरण, त्याचा मित्र परिवार इत्यादी घटकांचा देखील विद्यार्थ्याच्या अध्ययनावर परिणाम होतो. ग्रामीण व शहरी भागातील काही घटकात तफावत आढळुन येते. शहरातील नावाजलेल्या काही मोजक्या शाळा सोडल्या तर महाराष्ट्रात तसेच परभणी जिल्हयात ग्रामीण भागातील परिस्थिती शहरी भागाच्या तुलनेत अजुनही फारसी समाधाकारक नाही. विद्यार्थ्याच्या अध्ययनातील अडथळे दूर करून त्यांच्या अध्ययन संपादकणुकीमध्ये वाढ करण्यासाठी विद्यार्थ्याच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

संशोधनाची गरज :-

शिक्षणाचा अर्थ अगदी एका शब्दात सांगायचा झाल्यास तो कसा सांगता येईल? शिक्षण म्हणजे बदल होय. मनुष्य जन्मापासून मृत्यूपर्यंत काहीं ना काहीतरी शिकतच असतो. शिकणे या संज्ञेत संस्कार होणे अंतर्भूत आहे. एकाद्या व्यक्तीने परिस्थितीचा उपयोग करून प्रयत्नपूर्वक स्वत:मध्ये जो बदल घडून आणलेला असतो त्याला शिक्षण म्हणता येईल.

शिक्षण (Education) आणि अध्ययन (Learning) हे दोन्ही शब्द आपण जवळ-जवळ एकाच अर्थाने वापरतो. शिक्षण म्हणजे विकास, शिक्षण म्हणजे सुसंस्कार, शिक्षण म्हणजे अभिव्यक्ती होय. एकूणच शिक्षण हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो. अध्ययन (Learning) हा शब्द आपण मर्यादित अर्थाने वापरतो. शिक्षण प्रक्रियेत अध्ययन, अध्यापन या प्रक्रिया अतिशय महत्वाच्या आहेत. दोन्ही प्रक्रिया परस्परावलंबी आहेत. उत्तम अध्यापन/मार्गदर्शन तेच की, ज्याचा परिणाम उत्तम अध्ययनात होईल. उत्तम अध्ययन म्हणजे विद्यार्थ्याला होणारे ज्ञान, त्याला होणारी कौशल्य प्राप्ती, त्याच्या अभिरूचीचा होणारा विकास व वृत्ती निर्मिती होय.

शिक्षण प्रक्रियेत अध्ययन प्रक्रिया ही मध्यवर्ती कल्पना आहे. अध्ययन जसे शाळेत घडते तसे शाळेबाहेरही घडते. या प्रक्रियेचा शिक्षकाशी अत्यंत जवळचा संबंध आहे. विद्यार्थी शिकतो म्हणजे नेमके काय करतो? त्याचे अध्ययन कसे घडते? अध्ययनावर कोणकोणत्या घटकांचा परिणाम होतो? अध्ययनात कोणकोणते अडथळे येतात? अध्ययनाचे नियंत्रण करणारे घटक कोणते. या सर्व गोष्टीचा अभ्यास विद्यार्थ्याच्या अध्ययनाच्या दृष्टिकोणातुन करणे महत्वाचे ठरते.

अध्ययन :-

सभोवतालच्या वातावरणाला अनुलक्षून जाणिवपूर्वक स्वत:च्या वर्तनात घडवुन आणलेले टिकाऊ स्वरूपाचे बदल होण्याची प्रक्रिया म्हणजे अध्ययन होय.

अनुभवातून संभवणाऱ्या वर्तनातील बदलास अध्ययन म्हणता येईल.

Learning is modification of behaviour through experience शिक्षणाचा अर्थ मर्यादित अर्थाने वापरल्या जाणाऱ्या अध्ययनाचा आहे. शिक्षण ही व्यापक संज्ञा असलयाने अध्ययन हे शिक्षणात समाविष्ट आहे.



बालकाला शिक्षण कुटुंबातुन मिळते त्यास अनौपचारिक शिक्षण म्हणतात. व्यक्ती सभोवतालच्या वातावरणात विकसित होत असतांना आपोआपच मिळते त्यास सहज शिक्षण म्हणतात तर जे शिक्षण अपणास शिक्षणसंस्थात अभ्यासक्रमानुसार मिळते. त्या शिक्षणास औपचारिक शिक्षण म्हणतात.

प्रत्येक बालकाच्या वर्तनावर व व्यक्तिमत्वावर अनुवंश आणि परिस्थिती यांचा परिणाम होत असतो.

अध्ययन प्रक्रिया वाटते तेवढी सोपी नाही. अध्ययन प्रक्रिया सोपी व सहज व्हावी, अध्ययनाद्वारे ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करून समायोजन क्षमता वाढावी अशी आपली अपेक्षा असते. अध्ययन प्रक्रिया चांगल्या रितीने घडून येणे हे अनेक घटकावर अवलंबुन असते. अध्ययन करणाऱ्या व्यक्तीच्या सभोवतालची परिस्थिती अध्ययनाला पुरक अथवा मारक ठरते. अध्ययनला प्रेरणा मिळाली तर अध्ययन चांगले होते. व्यक्तीला शारीरिक व मानसिक थकवा आला की, अध्ययनाला ते मारक ठरते. व्यक्तीच्या अभिरूचीचा व अवधानाचा तसेच त्यांच्या बुध्दीमत्तेचा अध्ययनावर परिणाम होत असतो. तसेच शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचाही अध्ययनावर परिणाम होत असतो. तसेच कुटूंबाचा सामाजिक व आर्थिक द दर्जा ही अध्ययनावर परिणाम करीत असतो.

परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळामध्ये विविध परिसरातून व वेगवेगळी कौटुंबिक पार्श्वभूमीत वाढलेली मुले अध्ययन करत असुन साधारणपणे प्रगत, साधारण, अप्रगत अशा तिन्ही प्रकारचे विद्यार्थी अध्ययन करत असतात. प्रत्येक मूल स्वतःच्या गतीने शिकते प्रत्येक मुलाची बुध्दिमता वेगवेगळी असते. त्यामुळे प्रत्येक मुलाबद्दलचे नियोजन दररोज बदलणारे असते. त्यामुळे शिक्षकांना वर्गातील प्रत्येक मुलाचे विषयज्ञान, समज, आवडी-निवडी, कल इत्यादी बालमानस शास्त्रीय बाबी आणि त्या मुलाच्या अध्ययनाच्या

दृष्टीने त्याचा उपयोग माहित असावयास हवा. वर्गात अध्यापन करताना शिक्षकांनी अप्रगत , साधारण आणि प्रगत अशा तिन्ही प्रकारच्या विद्यार्थ्याकडे लक्ष द्यावयास हवे. परंतु तसे होत नाही. काही मुले अध्ययनात मागे पडतात. तर प्रगत मुलाकडे दुर्लक्ष होते. अशा मुलांच्या अध्ययनावर बरेच घटक परिणाम करीत आहे. त्यामुळे महाराष्ट्राप्रमाणेच परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थीही वाचन, लेखन, संख्याज्ञान व संख्येवरील मूलभूत क्रिया याचे अध्ययन करण्यात कमी पडत आहे. असे (State Learning Achievement Servey- SLAS) राज्यस्तरीय अध्ययन संपादणुक सर्वेक्षणानुसार सिध्द झाले आहे.

म्हणून परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी अध्ययनात का मागे पडत आहेत? त्यावर कोणकोणत्या घटकाचा परिणाम होत आहे? मागे पडण्याची कोणती कारणे आहे? हे पाहणे गरजेचे पडते व त्यावर योग्य त्या उपाय योजना सुचविणे महत्वाचे वाटते. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्याचे ठरविले आहे.

संशोधनाची महत्व :-

शिक्षण हक्क कायद्यातील कलम 29 (2) (ह) नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमतांची पडताळणी करणे आवश्यक आहे. कायद्यातील या अपेक्षा आणि तरतुदी विचारात घेऊन दि. 20 ऑगस्ट 2010 च्या शासन निर्णयानुसार राज्यात इयत्ता 1 ली ते 8 वी साठी सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन पध्दती लागू केली आहे. त्यानुसार एकही मूल अप्रगत राहणार नाही. यासाठी आवश्यक त्या गोष्टी करण्यासाठी शासन, प्रशासन, शालेय व्यवस्थापन विशेष प्रयत्न करीत असून शिक्षकांनी त्याची मुख्य जबाबदारी घेणे आवश्यक आहे. शाळेत दाखल झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या वयोगटानुरूप अपेक्षित अध्ययन संपादणुक प्राप्त करण्यासाठी शिक्षक अहोरात्र झटत असतो. जे विद्यार्थी अनियमित असतात. त्यांचा शाळेतील नियमित सहभाग शाळाव्यवस्थापन समितीच्या सहभागाने वाढविणे ही शिक्षकाची व मुख्याध्यापकाची जबाबदारी आहे. शाळेत नियमित असून अप्रगत असतील अशा विद्यार्थ्यांना संबंधित इयत्तेच्या अखेरीस अपेक्षित अध्ययन संपादणुक प्राप्त करणे आवश्यक आहे म्हणजेच शाळेतील अप्रगत विद्यार्थी, साधारण विद्यार्थी, प्रगत विद्यार्थी या सर्वांच्या अध्ययन संपादणुकीमध्ये वाढ होणे आवश्यक ठरते. त्यासाठी शिक्षकाला बालमानसशास्त्र, अध्यापनशास्त्र आणि विषयज्ञान असेल तरच शिक्षकाच्या वेळेचा जास्त उपयोग मुलांना होईल. वरील तिन्ही बाबींची जाण असलेल्या शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जास्त वेळ द्या असे सांगण्याची वेळच येणार नाही.

शिक्षकांच्या संकल्पनामध्ये विषयज्ञान, बालमानसशास्त्र आणि अध्यापन शास्त्र या तीन घटकांचा समावेश असणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुक वाढीचे प्रयत्न भावनिक स्तरावर न करता बौध्दिक स्तरावर करणे म्हणजे कार्यकारणभावाचे विश्लेषण करून चिन्हीत केलेल्या समस्यांवर उपाययोजना करणे म्हणजेच तर्कशुध्द पध्दतीने वैज्ञानिक दृष्टिकोणाचा वापर करून कार्य करणे होय.

मुले दररोज शाळेत जातात. शिक्षक त्यांना शिकवितात तरी देखील मुलांना शिकण्यात अनेक अडथळे येतात. त्यामागील कारणे शोधुन शास्त्रीय पध्दतीने त्यावर

उपाय करणे आवश्यक आहे. या पध्दतीच्या वापराने आपल्या समस्या सुटणे शक्य आहे. अन्यथा आपण समस्येमध्येच गुरफटुन जाऊ आणि तिथेच गरगरत राहू. कोणत्याही प्रकारचे अध्ययन होत असतांना विद्यार्थी व तो ज्या वातावरणात अध्ययन करीत असतो. ते वातावरण या दोन बाबी अध्ययनाशी निगडीत असतात. साहजिकच विद्यार्थ्याचे वय, पक्वता, लिंग, मनःस्थिती, थकवा व कंटाळा, अवधान व अभिरूची, बुध्दिमता व अध्ययनासाठी मिळणारी प्रेरणा इत्यादी विद्यार्थ्याशी संबंधीत घटकांचा अध्ययनाच्या वेगावर व परिणामकारकतेवर परिणाम होत असतो. या सर्व बाबींची माहिती शिक्षकास, मुख्याध्यापकास, शालेय व्यवस्थापन समिती व शासन-प्रशासन इत्यादी घटकांना माहीत असणे आवश्यक असते. शिक्षक- विद्यार्थी यांचे नाते तर फार जवळचे व आपुलकीचे असते.

राज्याप्रमाणेच परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्याच्या अध्ययनाची संपादणुक पातळी असमाधानकारक असल्या कारणाने अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

1. वर्गाअध्यापन करताना शिक्षकांना प्रत्येक मुलाच्या शिकण्याची गती माहीत करून घेऊन त्यांच्या अध्ययनातील अडथळे शोधुन निदानात्मक उपाययोजना करण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.
2. विद्यार्थ्याच्या अध्ययनात अडथळा ठरणाऱ्या कारणांचा शोध घेऊन योग्य ते उपचार करण्यासाठी शिक्षकाला प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.
3. विद्यार्थ्याच्या अध्ययनात अडथळा ठरणाऱ्या किंवा प्रगतीस पोषक ठरणाऱ्या शाळेशी संबंधित घटकांत सुधारणा करण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.
4. विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन त्यांचे अध्ययन संपादणुक सुधारण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.
5. विद्यार्थ्यांशी संबंधित शिक्षक, मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन, शासन प्रशासन व पालक, शिक्षण तज्ज्ञ इत्यादी घटकांना प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरेल.

अशा प्रकारे प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व अधोरेखीत होते.

संशोधनाचे शीर्षक :- परभणी जिल्हयातील ग्रामीण व शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्याच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.

समस्या विधान :- परभणी जिल्हयातील ग्रामीण व शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.

परिकल्पना :- परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळामधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर विविध घटाकांचा परिणाम होत आहे.

कार्यात्मक व्याख्या :-

1. **परभणी जिल्हा** :- मराठवाडयातील आठ जिल्हयापैकी नऊ तालुक्यांचा मिळुन बनलेला एक जिल्हा जेथे संशोधक आपले कार्य करणार आहे.
2. **प्राथमिक शाळा** :- परभणी जिल्हयामधील जि.प./न.पा.व खाजगी मराठी माध्यमाच्या प्राथमिक (इ. 1 ते 5 वी) उच्च प्राथमिक (इ. 1 ते 8 वी) पर्यंतच्या प्राथमिक शाळा जेथे संशोधक आपले कार्य करणार आहे.
3. **विद्यार्थी** :- वर्ग 1 ते 8 मधील 6 ते 14 वर्षे वयोगटातील प्राथमिक शाळेत अध्ययन करणारी मुले.
4. **अध्ययन संपादणुक** :- सभोवतालच्या वातावरणाला अनुलक्षुन सवयी, ज्ञान व वृत्ती यांचे संपादन करणे.
5. **परिणाम करणारे घटक** :- अध्ययन संपादणुकीस कारणीभूत ठरणारे घटक- बुध्दिमत्ता, कंटाळा, थकवा, प्रेरणा, मानसिक वय, शाळेचे भौतिक घटक, शाळेचे वातारण, शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, कुटुंबाची पार्श्वभूमी इ. घटक

उद्दिष्टये :-

1. परभणी जिल्हयातील ग्रामीण आणि शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. अध्ययनार्थ्याशी संबंधित घटकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
3. शिक्षकांशी संबंधित घटकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
4. शालेय वातावरणाशी संबंधित घटकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
5. कुटुंबाशी संबंधित घटकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
6. विद्यार्थ्याला मिळणारी प्रेरणा आणि प्राविण्यांशी संबंधित घटकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

चले :-

1. आश्रयी चले :- विद्यार्थ्याची अध्ययन संपादणुक
2. स्वाश्रयी चले :- विद्यार्थ्याच्या अध्ययनावर परिणाम करणारे घटक
   1. विद्यार्थ्याशी संबंधीत
   2. शिक्षकांशी संबंधित
   3. शालेय वातावरणाशी संबंधित
   4. कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक दर्जाशी संबंधीत
   5. विद्यार्थ्याला मिळणारी प्रेरणा किंवा प्राविण्यांशी संबंधीत

गृहितके :-

1. वर्गात अध्यापन करताना शिक्षक अप्रगत, साधारण आणि प्रगत अशा तिन्ही प्रकारच्या विद्यार्थ्याकडे योग्य प्रमाणात लक्ष देतात.
2. प्रत्येक मूल स्वतःच्या गतीने शिकते.
3. शिक्षकांना वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याचे विषयज्ञान, समज, अध्ययन पातळी, आवडी निवडी, कल या बालमानसशास्त्रीय बाबी माहीत आहेत.
4. मुलांच्या अध्ययनाच्या दृष्टीने बालमानसशास्त्रीय बाबीचे उपयोग शिक्षक दैनंदिन कार्यात करत असतात.
5. शाळेच्या परिसरातच राहणारी परंतु शाळेत न येणारी अनियमित मुले असतात.
6. मुलांच्या अध्ययनावर अनेक घटकांचा परिणाम होत असतो.

व्याप्ती :-

1. प्रस्तुत संशोधन हे विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधनाची कार्यक्षेत्र परभणी जिल्हयातील 9 (नऊ) तालुक्यापुरते आहे.
3. प्रस्तुत संशोधन हे ग्रामीण जि.प.,खाजगी अनुदानीत व शहरी खाजगी अनुदानीत व खाजगी विनाअनुदानीत, न.प./जि.प. या शाळांमधील इयत्ता 1 ते 8 वर्गातील, 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यापुरते राहील.
4. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या संबंधित घटकांचा अभ्यास करण्यात येईल.
5. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या केवळ अध्ययनाशी संबंधित घटकांचा अभ्यास केला जाईल.

मर्यादा :-

1. **क्षेत्र मर्यादा :-** प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे परभणी जिल्हयातील नऊ तालुक्यापुरतेच राहील.
2. **घटक मर्यादा :-** प्रस्तुत संशोधन हे परभणी जिल्हयातील ग्रामीण व शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांशी संबंधित असेल.
3. **कालमर्यादा :-** प्रस्तुत संशोधनाचा कालावधी तीन वर्षाचा म्हणजेच 2016-17 ते 2018-19 पर्यंतचा असेल.

संशोधन पध्दती :-

परभणी जिल्हयातील ग्रामीण व शहरी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा तुलनात्मक अभ्यास. या प्रस्तुत संशोधनासाठी मुलाचे अध्ययन कसे होते? त्यावर विद्यार्थ्याशी संबंधीत अध्ययनावर परिणाम करणारे घटक, शिक्षकांशी संबंधीत घटक, शालेय वातावरणाशी संबंधीत घटक व विद्यार्थ्याची प्रेरणा व प्राविण्याशी संबंधीत घटक इत्यादी घटकांचा विद्यार्थ्यांच्या अध्यायनावर कोणता व कसा परिणाम होतो हे पडताळुन पाहण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा व कुटुंबाशी संबंधित घटकांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

जनसंख्या निवड :-

प्रस्तुत संशोधनात जनसंख्या म्हणून परभणी जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडलेले आहे. परभणी जिल्हयातील सर्व नऊ तालुक्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व त्याच्याशी संबंधित सर्व घटक हे जनसंख्येत समाविष्ट असतील.

न्यादर्श निवड :-

संपूर्ण परभणी जिल्हा हे प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या म्हणून निवडलेले असून नऊ तालुक्यातील काही ठराविक प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची व त्यांच्या अध्ययन संपादणुकीशी संबंधित घटकांची सुगम यादृच्छिक (Random Selection Method) पध्दतीने न्यादर्श म्हणून निवड केलेली आहे.

न्यादर्श अभ्यासातुन आलेले निष्कर्ष हे संपूर्ण जनसंख्येचे प्रतिनिधीत्व करत असल्यामुळे ते संपूर्ण जनसंख्येला लागू पडतील. न्यादर्शाची निवड खालील प्रमाणे असेल.

न्यादर्श- विद्यार्थी (100)

विभाग निहाय विद्यार्थी विवरण

विभाग	मुले	मुली	एकूण
ग्रामीण	30	30	60
शहरी	20	20	40
एकूण	50	50	100

शाळा निहाय विद्यार्थी विवरण

शाळेचा प्रकार	मुले	मुली	एकूण
जि.प.(ग्रामीण)	20	20	40
खाजगी अनुदानीत	20	20	40
खाजगी विनाअनुदनीत	05	05	10
न.प./जि.प. (शहरी)	05	05	10
एकूण	50	50	100

वर्ग निहाय विद्यार्थी विवरण

वर्ग	मुले	मुली	एकूण
4 था	10	10	20
5 वा	10	10	20
6 वा	10	10	20
7 वा	10	10	20
8 वा	10	10	20
एकूण	50	50	100

तालुका निहाय विद्यार्थी विवरणः

अ.क्र.	तालुका	मुले	मुली	एकूण
1.	परभणी	10	10	20
2.	मानवत	05	05	10
3.	गंगाखेड	05	05	10
4.	पालम	05	05	10
5.	पूर्णा	05	05	10
6.	सोनपेठ	05	05	10
7.	पाथरी	05	05	10
8.	सेलू	05	05	10
9.	जिंतूर	05	05	10
10.	एकूण	50	50	100

माहिती मिळविण्याची साधने :-

प्रस्तुत संशोधनात माहिती मिळविण्यासाठी पुढील साधने निवडलेली आहेत.

1.मानसशास्त्रीय प्रयोग 2. निरीक्षणे व नोंदी 3. मानसशास्त्रीय /बुध्दिमापन चाचणी 4. प्रश्नावली 5. मतावली 6. कल चाचणी 7. माहिती विश्लेषण आराखडा 8. मुलाखत

सामग्री विश्लेषण पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक तेथे विश्लेषण करण्यासाठी 1. वर्णनात्मक सांख्यिकी 2. अनुमानात्मक सांख्यिकी या विश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात येईल.

आधार सामग्रीचे प्रकार :-

प्रस्तुत संशोधनासाठी गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करणसाठी नामांकन व अंतरश्रेणी या मापनश्रेणीचा वापर करण्यात येईल.

माहिती विश्लेषणाची पध्दती :-

प्रस्तुत संशोधनातील मिळविलेल्या संख्याशास्त्रीय माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी /मध्यमान, संयुक्त मध्यमान तसेच पिअर्सनचा परिघात गुणक सहसंबंध गुणांक व टी - चाचणी / CR क्रांतिक गुणोत्तर आणि आवश्यक तिथे टक्केवारी इत्यादीचा वापर करण्यात येईल.

सारांश, निष्कर्ष - शिफारशी :-

प्रस्तुत संशोधनातुन मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून व अर्थनिर्वचन करून योग्य ते निष्कर्ष काढले जातील आणि आवश्यक त्या शिफारशी करण्यात येतील.

प्रकरण योजना

अ.क्र.	प्रकरण क्र.	प्रकरणाचे नाव
1.	01	संशोधनाची प्रस्तावना
2.	02.	संदर्भ साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा
3.	03.	संशोधन कार्यपध्दती
4.	04.	माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन
5.	05	सारांश, निष्कर्ष-शिफारशी
	---	संदर्भ सूची व परिशिष्टे

वेळापत्रक

अ.क्र.	घटक/विवरण	कालावधी
1.	संदर्भ ग्रंथाचा व पुस्तकांचाअ भ्यास करून संशोधनाशी संबंधित साहित्य मिळविणे .	2 महिने
2.	कोर्स वर्क व इतर कार्य पूर्ण करणे.	7 महिने
3.	उद्दिष्टानुसार संशोधनाची साधने विकसन व मार्गदर्शकाची मान्यता	3 महिने
4.	संशोधनाशी संबंधित माहितीचे संकलन करणे.	4 महिने
5.	माहितीचे विश्लेषण करून अर्थ निर्वचन करणे.	4 महिने
6.	संशोधनाचे अहवाल लेखन मुद्दे व उपमुद्दे	3 महिने
7.	प्रकरण निहाय लेखन, चर्चा व मान्यता	4 महिने
8.	परिशिष्टे चर्चा व मान्यता	2 महिने
9.	हस्तलिखित मान्यता	2 महिने
10.	अहवालाचे टंकलेखन/संगणकीय डी.टी.पी. व बांधणी	3 महिने
	एकूण	**34 महिने (2 वर्षे 10 महिने)**

अंदाजपत्रक

अ.क्र.	विवरण	अंदाजे खर्च
1.	संशोधनासाठी आवश्यक साधनसामग्री खर्च	20,000.00
2.	टपाल/ दूरध्वनी/ संगणक हाताळणी/इंटरनेट वापर	20,000.00
3.	संदर्भ साहित्य व ग्रंथालयाचा खर्च	5,000.00
4.	प्रवास व निवास खर्च	15,000.00
5.	संशोधन अहवाल टंकलेखन व बांधणी खर्च	20,000.00
	एकूण खर्च	**80,000.00**

संशोधकाचे नाव

वाघ रामेश्वर दगडोबा

मार्गदर्शकाचे नाव

श्री. टेकाळे एस.एस.